**<u>सं. फौ. ख. क्र.४८८/२०२२</u>**
**<u>अनंत नागरी सह. पत. वि. शामराव पवार</u>**
**<u>निशाणी क्र.१५ च्या पुढे.</u>**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ सुधीर भोसले यांचा पुढील सरतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री.एच. डी. नरुटे, यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

६. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१५ वर दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. मला अनंत नागरी सहकारी पतसंस्था यांचेतर्फे ठराव क्र.७ दि.१९/०४/२०२१ नुसार प्रकरण चालविण्याचे अधिकार दिलेले आहेत. आता मला सदर प्रत दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>नि.क्र.२१</u>** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.२०/१ वरील चेक दाखविण्यात आला. तो आरोपीने फिर्यादीस दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.२२</u>** देण्यात येतो. नि.क्र.२०/२ वर मी चेक परत आल्याचा मेमो दाखल केलेला आहे. सदर मेमोस **<u>नि.क्र.२३</u>** देण्यात येते. नि.क्र.२०/३ वर फिर्यादीस बँकेने पाठविलेले पत्र दाखविण्यात आले. त्यास **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते. नि.क्र.२०/४ आरोपी यांनी पतसंस्थेकडे कर्ज मागणी अर्ज दिला होता. आता मला सदर अर्ज दाखविला. तो तोच आहे. त्यास **<u>नि.क्र.२५</u>** देण्यात येते. आरोपीने कर्जरोखा लिहून दिला. त्यास **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येते. तसेच आरोपीने वचनचिठ्ठी लिहून दिली. त्यास **<u>नि.क्र.२७</u>** देण्यात येते. संस्थेमध्ये व आरोपीमध्ये करारनामा झाला. आता मला सदर करारनामा दाखविला. तो तोच आहे. त्यास **<u>नि.क्र.२८</u>** देण्यात येते. आरोपीच्या खात्याची खातावणी मी दाखल केलेली आहे. त्यास **<u>नि.क्र.२९</u>** देण्यात येते. आता मला फिर्यादी संस्थेने आरोपीला दि.३०/०६/२०२२ रोजी नोटीस पाठविली. आता मला सदर नोटीस दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>नि.क्र.३०</u>** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीला पाठविल्याची पावती दाखल केली आहे. त्यास **<u>नि.क्र.३१</u>** देण्यात येते. आरोपीस सदर नोटीस पोहोचलेबाबत अहवाल दाखल केलेला आहे. त्यास **<u>नि.क्र.३२</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. आर. आर. बनसोडे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

७. मी २००६ पासून फिर्यादी संस्थेमध्ये कामाला आहे. मी प्रभारी सचिव आहे.

नि.क्र.२१ मध्ये माझे पद क्लर्क म्हणून लिहिले आहे. मी तीन महिन्यापुर्वी प्रभारी सचिव झालो. संस्थेचे काम हे निबंधक कार्यालयातील ठरवून दिलेल्या नियमानूसार चालते. संस्थेला बाय लॉजचे पुस्तकाचे जतन करावे लागते. मी संस्थेचे बाय लॉज वाचलेले आहेत. आरोपीचे कर्ज हे वैयक्तीक कर्ज प्रकारामध्ये मोडते. उपनियमानूसार संस्था ही पंचवीस लाखापर्यंत वैयक्तीक कर्ज देवू शकते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने घेतलेल्या कर्जाचा प्रकार हा विना तारण कर्ज प्रकारामध्ये मोडतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये जामीनदाराचे क्षेत्र हे तारण घेतलेले आहे. मी प्रस्तुत कर्ज प्रकरणाबाबतची सर्व कागदपत्रे दाखल केलेली आहेत. संस्थेकडे या प्रकरणासंबंधातील इतर कागदपत्र नाहीत. या प्रकरणामध्ये जामीनदाराची जमीन तारण घेतल्याबाबत कागदपत्र दाखल केली नाहीत. उपनियमानूसार संस्था ही पंचवीस लाखापर्यंत तारण कर्ज देवू शकते. तारण व विनातारण दोन्ही कर्ज प्रकारामध्ये पंचवीस लाखापर्यंत उपनियमानूसार संस्था कर्ज देवू शकते. मी संस्थेच्या उपनियमांची प्रत संस्थेला विचारून दाखल करू शकतो. संस्थेमध्ये उपनियम (बाय लॉज) चे पुस्तक आहे का कसे हे मला सांगता येणार नाही. संस्थेच्या उपनियमामध्ये संस्थेचे नाव, सभासदांचे नाव व निबंधकाची सही असते. उपनियमांचे पुस्तक हे संस्थेला दिले जाते. हे म्हणणे खरे नाही की, संस्थेला केवळ उपनियमाप्रमाणे एक लाखापर्यंत वैयक्तीक कर्ज देता येते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे कर्ज हे वैयक्तीक कर्ज आहे व त्यासाठी मी म्हणतो त्याप्रमाणे कोणतीही जमीन तारण घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जर कर्जाला कोणतीही जमीन तारण घेतली नसेल तर ते कर्ज एक लाखाच्या रक्कमेपर्यंतच देता येते. मी जामीनदाराचे शेत तारण घेतले याचे कागदपत्र दाखल करू शकतो. साक्षीदार सांगतो की, ७/१२ दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत तारण देण्याचा व्यवहार हा लिखीत स्वरूपात असतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये तारणाचा लिखीत करार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जामीनदाराची जमीन तारण घेतल्याचे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न – संस्थेमध्ये व आरोपीमध्ये तारणाचा व्यवहार कसा होतो ?

उत्तर – संस्थेचे व कर्जदाराचे सही शिक्के हे तलाठयाकडे देवून पत्र दिले जाते. त्यानुसार जमीन तारण होते.

८. प्रस्तुत प्रकरणामध्ये तलाठयांना पत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तलाठयांना दिलेले पत्र हे कर्ज प्रकरणाचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, तलाठयांना दिलेले पत्र याची एक प्रत संस्थेकडे राहते. हे म्हणणे खरे नाही की, संस्थेने व आरोपीने

संयुक्तीक पत्र दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२१ नुसार ठराव झाल्याचे मी खोटे सांगत आहे. मी संस्थेला विचारलेशिवाय ठरावाचे प्रोसिडींग दाखल करू शकत नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो........**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.३१/०७/२०२५**